दिवाणी दावा क्र. ६१५/२०२२
नियाजोद्दीन वि. हरन्याबाई व इतर
निशाणी क्र.१५ वर



**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री.एस.व्ही.देशमुख यांच्यामार्फत शपथेवर पुढे सुरु:-**

**११.** हे म्हणणे खरे नाही की, मी अहमदपूर येथे राहतो. मी मौलाना म्हणून शिक्षण घेतले आहे, मी शेतकरी म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.४ व ५ हिप्पळगाव येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हे हिप्पळगाव येथे शेती करुन उदरनिर्वाह करतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींवर सावकीरकीच्या केसेस दाखल नाहीत. मी अशा केसेसबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिलांना सन १९९१ साली पैशांची गरज होती, त्यामुळे त्यांनी प्रतिवादींकडे रक्कम रुपये २०,०००/- ची मागणी केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी पैसे देण्याच्या मोबदल्यात जमिन तारणापोटी ठेवण्याची मागणी केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसा प्रतिवादी व माझे वडिलांमध्ये तोंडी करार झाला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील प्रतिवादींना दरवर्षी व्याजाची रक्कम देत होते, हे मी खोटे सांगत आहे.

**१२.** मी दाव्यात नमूद खरेदीखत क्र.२३९९/१९९१ चा दस्त पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, या खरेदीखतात फेर खरेदीखत करुन द्यायचे असे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, या खरेदीखतात ताबा प्रतिवादींना दिल्याचे नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सहाय्यक निबंधक, अहमदपूर यांच्याकडे प्रतिवादींच्या लाभात करुन दिलेले खरेदीखत सावकीरकीच्या व्यवहारातून असल्याबाबत अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, हा अर्ज फेटाळण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सहाय्यक निबंधक यांचे निकालाविरुध्द जिल्हा निबंधक यांच्याकडे अपील दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना करुन देण्यात आलेले खरेदीखत व त्याचा फेरफार यांचेविरुध्द माझे वडिलांनी त्यांचे हयातीत कुठेही आक्षेप नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेर खरेदीखत करुन देण्याकामी आम्ही कधीही प्रतिवादींकडे गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत क्र.२३९९/१९९१ हे कायदेशीर व आमच्यावर बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही कारणाशिवाय खोटा दावा दाखल केला. मी प्रतिवादींना त्यांनी दिलेल्या पैशांच्या मोबदल्यात माझे वडिलांनी किंवा मी त्यांना व्याज दिले, त्याबाबतच्या पावत्या दाखल करु शकत नाही. या जमिनीशिवाय माझेकडे

आजरोजी दोन एकर जमीन आहे. वादी क्र.३ हे शिक्षक म्हणून नळेगांव येथे काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केला व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदपूर.

स्थळ - अहमदपूर.
दिनांक- १८/१२/२०२५